18 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ 'लोकल टू ग्लोबल'

कोल्हापूर : सचिन टिपकुर्ले

शिवाजी विद्यापीठाचा आज ५९ वा वर्धापनदिन साजरा होत आहे. आजपर्यंत लाखो विद्यार्थ्यांनी या विद्यापीठात शिक्षण घेऊन यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करत विद्यापीठाचे नाव जगभरात पोहोचविले आहे. त्यामुळे लोकल असणाऱ्या विद्यापीठाला आता 'ग्लोबल टच' मिळाला आहे. विद्यापीठाने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांशी सामंजस्य करार करून शैक्षणिक देवाणघेवाण करत उंच भरारी घेतली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या नावलौकिकात दिवसेंदिवस भर पडत आहे.

## ५९ वा वर्धापनदिन विशेष

| | |
|---|---|
| शिक्षक कर्मचारी | 273 |
| प्रशासकीय कर्मचारी | 504 |
| विद्यापीठात प्रवेश घेतलेले विद्यार्थी | 7,147 |
| ब:हिस्थ विद्यार्थी | 24,908 |
| संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी | 2,50,000 |
| मुलांची वसतिगृहे | 15 |
| आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह | 1 |



"शिवाजी विद्यापीठाचा स्थापनेपासून ते आजपर्यंत शैक्षणिक आलेख उंचावत आला आहे. विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. बदलत्या आव्हानांना सामोरे जात विद्यापीठाने शैक्षणिक प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. संशोधन क्षेत्रात प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळवलेले यश कौतुकास्पद आहे.

- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**ग्यान योजनेंतर्गत आयोजित कार्यक्रम** : ८, प्रकाशने : ६,७१०, सायटेशन्स : ८९,९०२

**मटेरियल सायन्समध्ये जागतिक क्रमवारी** : २४९, इनक्युबेशन सेंटर : विद्यापीठ कार्यक्षेत्र ३, संलग्नित महाविद्यालये : २१, रुसा प्रायोजित केंद्रे : ४

**सामंजस्य करार** : राष्ट्रीय : ५५
आंतरराष्ट्रीय : ३१
औद्योगिक : १३



- शिवाजी विद्यापीठ स्थापना : १८ नोव्हेंबर १९६२
- कार्यक्षेत्र : कोल्हापूर, सांगली, सातारा
- संलग्नित महाविद्यालये : २७६
- मान्यताप्राप्त संशोधन संस्था : १६

स्टेडियम : ६, सिंथेटिक ट्रॅक : १, ओपन जिम : १, सभागृहे : ७, खुले सभागृह : १,ओपन थिएटर : १, सेमिनार हॉल २३, संग्रहालये : २, अभियांत्रिकी कार्यशाळा : २, आरोग्य केंद्र : १, इन्स्ट्रुमेंटेशन सेंटर : ५, प्रिंटिंग प्रेस : १, बगीचे : ३७ एकर, रोपवाटिका : २, कॅम्पसमधील झाडे : १३ हजार ५००, बायोगॅस प्लँट : २, डेटा सेंटर : २, रेकॉर्डिंग स्टुडिओ १, सौरऊर्जानिर्मिती : १८० किलो वॅट, स्मार्ट क्लासरूम : ३९, सीसीटीव्ही : ६४६, इंटरनेट कनेक्टिव्हिटी : ३ हजार प्लस, वायफाय झोन्स : ६२, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग : ४, जलसंसाधने : पाणी शुद्धीकरण प्रकल्प : १ (सहा हजार लिटर प्रतितास प्रक्रिया), मातीचे धरण : ३, शेततलाव : १०, पाण्याच्या विहिरी : ९, पृष्ठभाग पाणी साठवण क्षमता : ३३ कोटी लिटर

**शैक्षणिक** : विद्याशाखा : ४, विभाग : ३३, अध्यासन : १०, यूजीसी योजना : ४, विविध अभ्यासक्रम : २२०, वाचनालये : ३, बोटॅनिकल गार्डन : १, कम्युनिटी डेव्हल्पमेंट सेंटर : १, विद्यापीठातील प्रकाशने (पुस्तके) : ११८, जर्नल्स : २, ज्ञान संसाधन केंद्रे : २०१, मुद्रित पुस्तके : २ लाख ७६ हजार ४२९, टायटल्स (शीर्षके) : २,२७,०१७, विशेष दुर्मीळ संग्रह : ३१,४०४, ब्रेल बुक्स : ५९०

## शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू

| क्र. | कुलगुरूंचे नाव |
|---|---|
| १ | डॉ. आप्पासाहेब पवार |
| २ | बॅ. पी. जी. पाटील |
| ३ | प्राचार्य बी. एस. भणगे |
| ४ | प्राचार्य आर. के. कणबरकर |
| ५ | प्राचार्य के. भोगीशयन |
| ६ | प्रा. के. बी. पोवार |
| ७ | प्रा. ए. टी. वरूटे |
| ८ | प्रा. डी. एन. धनागरे |
| ९ | प्रा. एम. जी. ताकवले |
| १० | प्रा. एम. एम. साळुंखे |
| ११ | प्रा. एन. जे. पवार |
| १२ | प्रा. देवानंद शिंदे |
| १३ | प्रा. डी. टी. शिर्के |

## आयएसओ ९००१-२०१५ प्रमाणपत्रप्राप्त विद्यापीठ


▸ नॅक (बंगळूर) यांच्याकडून चौथ्या पुनर्मूल्यांकन फेरीमध्ये ३.५२ सीजीपीए गुणांकनासह A++ नामांकन. ▸ केंद्रीय कार्पोरेट अफेअर्स मंत्रालय यांच्याकडून विद्यापीठाला संशोधन व विकास फाऊंडेशन सेक्शन ८ कंपनी म्हणून मान्यता. ▸ ब्रिक्स देशांसाठीच्या QS-BRICS युनिव्हर्सिटी रँकिंग २०२० मध्ये विद्यापीठास २५१-२६० बँडमध्ये स्थान. ▸ भारतीय क्रमवारीत प्रतिपेपर सायटेशन या निकषामध्ये द्वितीय स्थान आणि प्रतिसंशोधक पेपर या निकषामध्ये देशात सतरावे स्थान. ▸ NIRF रँकिंग २०२१ मध्ये १०१-१५० बँडमध्ये स्थान. ▸ अमेरिकेच्या आल्पर डॉजर तथा ए. डी. सायंटिफिक इंडेक्सनुसार वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग या क्रमवारीमध्ये विद्यापीठातील कुलगुरू आणि प्र-कुलगुरू यांच्यासह एकूण ४८ वैज्ञानिक संशोधकांचा समावेश. ▸ ऑक्सफर्ड विद्यापीठाने विश्लेषित केलेल्या जागतिक स्तरावरील २ टक्के आघाडीच्या संशोधकांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाच्या ९ संशोधकांना स्थान. ▸ प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट संशोधनाच्या क्षेत्रात संशोधकांच्या यादीत टॉप १५० मध्ये १४७ वा क्रमांक, तर देशात दुसरे स्थान.

18 NOV 2021

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेजमध्ये लोकशाही क्लब, विद्यार्थी संसद राबवा

## राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांचे आवाहन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित बैठकीत बोलताना राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे. सोबत जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकशाहीच्या विविध आयुधांची विद्यार्थ्यांना माहिती मिळाली पाहिजे. तसेच लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढवण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर 'लोकशाही क्लब', व विद्यार्थी संसदसारखे उपक्रम राबवा, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले.

देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट देऊन विद्यापीठातील निवडक अधिकारी व प्राचार्य यांच्याबरोबर चर्चा केली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांची प्रमुख उपस्थिती होती.

देशपांडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ मतदाता म्हणून नव्हे, तर लोकशाही प्रक्रियेतील एक सजग घटक म्हणून आपले कर्तव्य बजावले पाहिजे. पुण्यात 'लोकशाही गप्पा" नावाचा उपक्रम राबविण्यास प्रारंभ झाला आहे. त्यामध्ये अनेक नामवंतांचा सहभाग असतो. त्याचप्रमाणे 'लोकशाही मूल्ये आणि शिक्षकांची भूमिका" यासारख्या विषयांवर विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आले. शंभर प्रथितयश मान्यवरांचा एक थिंक टँक निर्माण करून त्यांच्याकरवी विचारमंथनातून अनेक विधायक सूचना समोर येतात. जीवनकौशल्ये आणि भविष्यातील संधी यांची सांगड घालून विद्यार्थ्यांना काम करण्यास प्रवृत्त करावे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, लोकशाहीच्या समृद्धी व विकासामध्ये युवा वर्गाचा सहभाग वाढविण्यासाठी विविध अभ्यासक्रमांसह लोकशाहीविषयक ऑनलाईन अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्राधारित उपक्रम राबविण्यास प्राधान्य आवश्यक आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. रविंद्र भणगे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी, प्रशासकीय सेवक आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापन दिन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन आज (दि. १८) नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या सोहळयासाठी सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत.

शिवाजी विद्यापीठात सकाळी ८.३० वाजता ध्वजावंदनाने या कार्यक्रमाला सुरुवात होईल. त्यानंतर मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू

- सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख पाहुण्या

सभागृहात पाहुण्यांचे भाषण व गुणवंतांचा सत्कार समारंभ होईल. यामध्ये विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव, उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार आदी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

लोकमत

# राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्यांना विशेष कोट्यातून प्रवेश

## विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जे विद्यार्थी कलाकार राष्ट्रीय स्पर्धेत विजेते होतील अथवा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतील, त्यांना विशेष कोट्यातून प्रवेश देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे.

ॲस्ट्रो टर्फच्या कामासाठी २५ टक्के खर्चास या परिषदेने मान्यता दिली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. विद्यापीठाच्या विद्यार्थी खेळाडूंना प्रवेशासाठी विशेष कोटा आहे. त्याप्रमाणे विद्यार्थी कलाकारांसाठी विशेष कोटा देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. या कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याने राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेत विजेतपद मिळविणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग असला, तरी त्या विद्यार्थ्याला या कोट्यामधून प्रवेश मिळणार आहे. या विद्यार्थ्यांकरिता प्रत्येक विभागात दोन जागा अथवा पाच टक्के जागा यातील जे अधिक असेल त्यानुसार प्रवेश दिला जाणार आहे.

- प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याने राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेत विजेतपद मिळविणे आवश्यक आहे
- सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग असला, तरी त्या विद्यार्थ्याला यातून प्रवेश मिळणार आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा आज ५९ वा वर्धापन दिन



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा गुरुवारी ५९ वा वर्धापन दिन साजरा होत आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यानंतर वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक व गुणवंत कर्मचारी सत्कार, संलग्न महाविद्यालय प्राचार्य व प्रशासकीय कर्मचारी सत्कार, आदर्श शिक्षक, शिक्षिका पुरस्कार, उत्कृष्ठ अधिविभाग पुरस्कार जाहीर करण्यात येणार आहेत. गुणवंतांचा डॉ. फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापनदिन

## मृणालिनी फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापनदिन आज, गुरुवारी साजरा होणार आहे. या कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित असणार आहेत.

विद्यापीठात सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन आणि त्यानंतर राजर्षी शाहू सभागृहात पावणेनऊ वाजता वर्धापनदिनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यात विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, गुणवंत प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक आदींचा सत्कार प्रमुख उपस्थितांच्या हस्ते होईल.

18 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापनदिनानिमित्त बुधवारी केलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने विद्यापीठाची मुख्य इमारत उजळून निघाली. (छाया : नसीर अत्तार)

18 NOV 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**शिवाजी विद्यापीठ वर्धापनदिन** | कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला बुधवारी विद्यापीठाचे मुख्य प्रशासकीय भवन विविधरंगी रोषणाईने असे न्हाऊन निघाले. (छाया : तय्यब अली)

18 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## विद्यापीठाला झळाळी...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापनदिन गुरुवारी (ता.१८) आहे. वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली.

18 NOV 2021

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# विद्यापीठ उजळले रोषणाईने...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारूढ पुतळ्यास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. नयनरम्य विद्युत रोषणाईने अवघा विद्यापीठ परिसर उजळून निघाला होता.

(छाया: रियाज ट्रेनर)

18 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नांदवडेकरांनी कुलसचिवपद जबाबदारीने हाताळले

## कुलगुरू डॉ. शिर्के यांचे गौरवोद्‌गार : निरोप समारंभात सपत्नीक सत्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा कार्यभार डॉ. विलास नांदवडेकर यांनी जबाबदारीने सांभाळून पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. डॉ. नांदवडेकर यांच्या निरोप समारंभात ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, या पदावर काम करीत असताना प्रशंसेपेक्षा विविध घटकांच्या व्यथा, अपेक्षा आणि तक्रारी यांचा मोठा ओघ व्यवस्थेमध्ये असतो. ते प्रश्न मार्गी लावण्याची जबाबदारी कुलसचिवांवर असते. येथील प्रश्न जबाबदारीने हाताळण्याचीही भूमिका कुलसचिवांना घ्यावी लागते. महापूर, कोरोना आदी संकटांमध्ये शासन व जिल्हा प्रशासन यांच्याप्रती सहकार्याची भूमिका घेऊन विद्यापीठाची समाजाभिमुखता जपली. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनीही डॉ. नांदवडेकर यांना शैक्षणिक, संशोधकीय अनुभवाच्या तुलनेत प्रशासकीय अनुभवाची पार्श्वभूमी नसतानाही शिवाजी विद्यापीठाच्या अतिव्यापक पटलावर यशस्वीपणे कार्य केले, असे सांगितले.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठावर प्रेम करणाऱ्या तसेच विद्यापीठाच्या हितासाठी व पारदर्शक कारभारासाठी कायम आग्रही असणाऱ्या लोकांसमवेत काम करण्याची संधी लाभली, याचे समाधान आहे. या कालावधीत एक विद्यार्थी म्हणूनच प्रशासकीय कारभार मी शिकत राहिलो. तत्कालीन कुलगुरूंसह विद्यमान कुलगुरूंनी मार्गदर्शन केले.

डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट देऊन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत यांनी मनोगते व्यक्त केली. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे यांनी आभार मानले.

18 NOV 2021
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाची सामाजिक बांधिलकी नांदवडेकरांनी जपली : कुलगुरू डॉ. शिर्के

## निरोप समारंभामध्ये ग्रंथभेट देऊन सपत्निक सत्कार

सकाळ वृत्तसेवा



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केला. या वेळी (डावीकडून) उपकुलसचिव संध्या अडसुळे, स्वाती खराडे, डॉ. विनिता रानडे, डॉ. नमिता खोत, डॉ. गजानन पळसे, वैशाली नांदवडेकर, अजित चौगुले, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. एस. एस. देशमुख आदी.**

कोल्हापूर, ता. १७ : ''कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी महापूर, कोरोना संकटकाळात शिवाजी विद्यापीठाची सामाजिक बांधिलकी जपत चांगले काम केले. सर्व घटकांशी समन्वय साधून कारकीर्द यशस्वी केली,'' असे गौरोवोद्‌गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

आज झालेल्या डॉ. नांदवडेकरांच्या निरोप समारंभात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट देऊन नांदवडेकर यांचा सपत्निक सत्कार केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''विद्यापीठाच्या कुलसचिव पदाला मोठे वलय आहे. येथे काम करताना प्रशंसेपेक्षा विविध घटकांच्या व्यथा, अपेक्षा आणि तक्रारी यांचा मोठा ओघ असतो. ते प्रश्न मार्गी लावण्याची जबाबदारी कुलसचिवांवर असते. सीमाभागातील शिनोळी (ता. चंदगड) येथील उपकेंद्र उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.'' सत्काराला उत्तर देताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठावर प्रेम करणाऱ्या तसेच विद्यापीठाचे हित, पारदर्शक कारभारासाठी आग्रही असणाऱ्या लोकांसमवेत काम करण्याची संधी लाभली. एक विद्यार्थी म्हणूनच प्रशासकीय कारभार शिकत राहिलो. तत्कालीन व विद्यमान कुलगुरूंचे मार्गदर्शन व सहकाऱ्यांनी दिलेले सहकार्य यावर कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण करता आला.''

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी मनोगत व्यक्त केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी आभार मानले. वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. एम.एस. देशमुख, डॉ. एन. बी. गायकवाड आदी उपस्थित होते.

**प्रभारी कुलसचिवपदी डॉ. शिंदे**

कुलसचिवांचा पदभार डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्याकडे देण्यात आला. नवीन कुलसचिव येईपर्यंत ते प्रभारी कुलसचिव असतील. शासनाच्या २०१३ च्या शासन निर्णयामुसार सेवा ज्येष्ठतेचा निकषानुसार त्यांच्याकडे हा पदभार देण्यात आला आहे.

18 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिवपदी व्ही. एन. शिंदे

## कार्यकाळ पूर्ण झाल्याने विलास नांदवडेकर यांना निरोप : कुलगुरूंच्या हस्ते सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे



विद्यमान कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ बुधवारी पूर्ण झाला. त्यामुळे या पदाचा प्रभारी कार्यभार विद्यापीठ प्रशासनाने उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यावर सोपविला. डॉ. नांदवडेकर यांचा सपत्नीक सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ. शिंदे सध्या विद्यापीठाच्या सभा, निवडणूक आणि पूरक सेवा विभागाच्या उपकुलसचिवपदी कार्यरत होते. यापूर्वी त्यांनी २०१५ पासून दीड वर्ष प्रभारी कुलसचिवपदी काम केले आहे. २०१० ते २०१२ या कालावधीत त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवपदाची जबाबदारी सांभाळली आहे.

दरम्यान, डॉ. नांदवडेकर यांचा निरोप समारंभ विद्यापीठ कार्यालयात झाला. महापूर, कोरोना, आदी संकटांच्या काळात शासन आणि जिल्हा प्रशासन यांच्याप्रती डॉ. विलास नांदवडेकर यांनी सहकार्याची भूमिका घेऊन विद्यापीठाची समाजाभिमुखता जपली आहे. सीमाभागातील शिनोळी (ता. चंदगड) येथील उपकेंद्र उभारण्यात महत्त्वाची भूमिका त्यांनी बजावली. कुलसचिवपदाचा कार्यभार त्यांनी जबाबदारीने सांभाळून पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

विद्यापीठाच्या हितासाठी आणि पारदर्शक कारभारासाठी कायम आग्रही असणाऱ्या लोकांसमवेत काम करण्याची संधी लाभल्याचे समाधान आहे. तत्कालीन कुलगुरूंसह विद्यमान कुलगुरूंनी केलेले मार्गदर्शन, सहकाऱ्यांनी दिलेले सहकार्य या बळावर कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण करता आला असल्याचे डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. एस. महाजन, आर. व्ही. गुरव, नमिता खोत, वैशाली नांदवडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी अजित चौगुले, एम. एस. देशमुख, एन. बी. गायकवाड, आदी उपस्थित होते. जी. आर. पळसे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### अर्जांची छाननी

शिवाजी विद्यापीठाने कुलसचिव, परीक्षा मंडळ व मूल्यमापन मंडळाचे संचालक नियुक्तीची प्रक्रिया मे महिन्यापासून सुरु आहे. त्यातील कुलसचिवपदासाठी ७२, तर परीक्षा मंडळाच्या संचालकपदासाठी ५१ जणांचे अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया सध्या सुरु आहे.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी डॉ. विलास नांदवडेकर यांचा कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी गजानन पळसे, पी. एस. पाटील, वैशाली नांदवडेकर, अजित चौगुले, आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

0 8 NOV 20..

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. नांदवडेकर यांचा कार्यकाळ संस्मरणीय

## कुलगुरू डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात कुलसचिवांना निरोप आणि सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदाचा कार्यभार डॉ. विलास नांदवडेकर यांनी जबाबदारीने सांभाळून पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला, त्यामुळे त्यांचा हा कार्यकाळ संस्मरणीय ठरेल, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी येथे काढले.

डॉ. नांदवडेकर यांच्या कुलसचिव पदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ बुधवारी पूर्ण झाला. त्या निमित्ताने विद्यापीठ कार्यालयात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. दरम्यान, कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट देऊन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

डॉ. शिर्के म्हणाले, नांदवडेकर यांनी समर्थपणे जबाबदारी पार पाडली.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठावर प्रेम करणाऱ्या, तसेच विद्यापीठाच्या हितासाठी व पारदर्शक कारभारासाठी कायम आग्रही असणाऱ्या लोकांसमवेत काम करण्याची संधी लाभली, याचे समाधान आहे. तत्कालीन कुलगुरूंसह विद्यमान कुलगुरूंनी केलेले मार्गदर्शन सहकाऱ्यांनी दिलेले सहकार्य या बळावर कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण करता आला. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. जी. आर. पळसे यांनी आभार मानले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, वैशाली नांदवडेकर उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ प्रभारी कुलसचिवपदी डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव म्हणून व्ही. एन. शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मावळते कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या निरोप समारंभानंतर बुधवारी रात्री हे आदेश काढण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील परीक्षा नियंत्रक, कुलसचिव पदाबरोबरच अन्य पदांच्या जाहिराती काढण्यात आल्या. त्याची छाननी अंतिम टप्प्यात आली आहे. अजून या प्रक्रियेत वेळ जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रभारी म्हणून डॉ. शिंदे यांच्याकडे पदाचा कार्यभार देण्यात आला आहे. शिंदे यांनी यापूर्वीही प्रभारी कुलसचिव पद भूषवले आहे.

सकाळ

# विद्यापीठ प्रवेश प्रक्रियेत कलाकारांसाठी विशेष कोटा

## व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेत कलाकारांसाठी अतिरिक्त कोटा निर्धारित केला आहे. जे कलाकार राष्ट्रीय स्पर्धेत विजेते होतील किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतील, त्यांना या कोट्यातून प्रवेश दिले जाणार आहेत. प्रत्येक विभागात दोन किंवा पाच टक्के कोटा ठेवण्यात आला आहे. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेतला.

विद्यापीठात कोणत्याही विभागात प्रवेश घेताना खेळाडूंसाठी विशेष कोटा आहे. त्याचधर्तीवर कलाकार विद्यार्थ्यांसाठीही कोटा ठेवण्यात आला आहे. यासाठी त्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्पर्धेत विजेतेपद मिळवलेले असले पाहिजे किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभाग असला पाहिजे. अशा कलाकार विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक विभागात २ जागा किंवा ५ टक्के जागा यातील सर्वात जास्त असेल त्याप्रमाणे प्रवेश दिले जातील. तसेच अॅस्ट्रो टर्फच्या कामासाठी २५ टक्के खर्चास मान्यताही देण्यात आली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

बैठकीला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

18 NOV 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. नांदवडेकर यांनी कुलसचिवपद जबाबदारीने सांभाळले

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे गौरवोदगार: विद्यापीठाकडून निरोप समारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिव पदाला मोठे वलय आहे. डॉ उषा इथापे यांच्यापासून ते डॉ.बी. पी. साबळे यांच्यापर्यंत अनेकांनी या पदाची प्रतिष्ठा वाढविली आहे. त्या पदावर काम करावयास मिळणे हाच मुळात मोठा सन्मान आहे. डॉ. नांदवडेकर यांना तो सन्मान लाभला. त्यांनी कुलसचिव पदाचा कार्यभार जबाबदारीने सांभाळून पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला आहे,असे गौरवोदगार कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज येथे काढले.

डॉ. नांदवडेकर यांच्या कुलसचिव पदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ बुधवारी पूर्ण झाला. त्या निमित्ताने विद्यापीठ कार्यालयात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते डॉ. नांदवडेकर यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कुलसचिव पदावर काम करताना अपेक्षा आणि तक्रारी यांचा मोठा ओघ व्यवस्थेमध्ये असतो. प्रश्न मार्गी लावण्याची जबाबदारी कुलसचिवांवर असते. नांदवडेकर यांनी महापूर,कोरोना या संकटांमध्ये शासन व जिल्हा प्रशासन यांच्याप्रती सहकार्याची भूमिका घेऊन विद्यापीठाची समाजाभिमुखता जपली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनीही डॉ. नांदवडेकर यांच्या कार्याचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी आभार मानले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली.

18 NOV 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनासह क्रीडा क्षेत्राला चालना

**शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना संशोधनाचा अतिउच्च उच्चांक गाठला आहे. संशोधनाला चालना देऊन जास्तीत जास्त पेटंट मिळवण्याचा प्रयत्न आहे. तसेच विविध योजना राबवण्यासाठी ५० कोटींचा प्रस्ताव तयार केला आहे. यातून संशोधन इन्स्टिट्यूट करण्याचा मनोदय असून, भाषांतराचे प्रकल्पही राबवले जाणार आहेत. नवीन स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारून एकाच छताखली सर्व क्रीडा प्रकारासाठीची मैदाने तयार करून पूरक अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. अशा प्रकारे क्रीडा विभागाला चालना देऊन ऑलंपिकमध्ये विद्यार्थी जावेत, या दृष्टीने नियोजन सुरू आहे.**



**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आराखडा तयार करण्यासाठी तीन समित्या नेमल्या आहेत. एक सल्लागार समिती असून या समितीच्या सल्ल्याने हा आराखडा तयार केला आहे. या समित्यांच्या बैठकांमध्ये आराखड्यावर सकारात्मक चर्चा झाली असून मंजूर करण्याबाबत अंतिम निर्णय होण्याच्या मार्गावर आहे. संशोधनाच्या माध्यमातून विद्यापीठासह संशोधकांच्या नावावर पेटंटची नोंद करण्याचा ध्यास आहे. नॅक मूल्यांकनाच्या दृष्टीने विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांना मदत केली जाईल. जेणेकरून विद्यापीठ संलग्न महाविद्यालयाला नॅकचे 'ए प्लस' मानांकन मिळेल. तसेच विद्यापीठातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज संशोधन केंद्राच्या परिसरात खुल्या जागेत वीरगळ, शिलालेखांचे खुले संग्रहालय नियोजित आहे. या म्युझियमच्या माध्यमातून संशोधकांसह विद्यार्थ्यांना इतिहास समजून घेण्यास मदत होईल. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी भवनची

- **शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी वर्षाचा आराखडा तयार**
- **संशोधनासह विविध नवीन योजनांसाठी ५० कोटींची तरतूद**

इमारत दूरशिक्षण विभाग परिसरात बांधण्यात येणार आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची गैरसोय होऊ नये म्हणून नवीन विद्यार्थिनी वसतिगृह बांधण्याची योजना आहे. एनएसएसच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सक्रीय सहभाग वाढवला जाईल. चार अधिविभागांना शैक्षणिक स्वायत्तता दिली जाईल. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवी आराखडा विद्यापीठाच्या प्रगतीमध्ये मैलाचा दगड ठरणार आहे.

**विद्यापीठात स्पोर्टस कॉम्प्लेक्स**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत खेळाडूंना चालना देण्यासाठी जिमखाना हॉल परिसरात स्पोर्टस् कॉम्प्लेक्स तयार केले जाणार आहे. यामध्ये अत्याधुनिक पध्दतीचे शुटींग रेंज, बॅडमिंटनचे चार कोर्ट, टेबल टेनिसचे चार कोर्ट आणि मल्टी जिम तयार केली जाणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यातून ३ ते ४ हजार विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. पहिल्यांदाच विद्यापीठात सर्व क्रीडा प्रकारासाठी मैदान तयार होत असल्याने क्रीडा विश्वात आनंदाचे वातावरण आहे. भविष्यातही विद्यापीठाचा खेळाडू प्रत्येक स्पर्धेतील एक नंबर खेळाडू ठरला पाहिजे, या दृष्टीने नियोजन सुरु आहे.

**छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याचा गौरव होणार**

छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्राच्या माध्यमातून त्यांचे जीवन, कार्य, आणि प्रभाव यांचे संशोधन करून त्यांचा परिपूर्ण इतिहास समोर आणला जाणार आहे. १७ ते १९ व्या शतकातील मराठ्यांचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, लष्करी आणि सांस्कृतिक इतिहासाचे संशोधन केले जाईल. ब्रिटिश काळातील मराठा संस्थानांचा अभ्यास केला जाईल. मराठाकालीन आणि संस्थाकालीन ऐतिहासिक वारसा संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याच ओळख करून दिली जाईल.

तरुण भारत

# प्रभारी कुलसचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा कार्यकाल संपला आहे. त्यांच्या रिक्त जागेवर प्रभारी कुलसचिव म्हणून डॉ. व्ही. एन. शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापुर्वी त्यांनी नांदेड विद्यापीठामध्ये दोन वर्षे कुलसचिव म्हणून काम केले आहे. तसेच शिवाजी विद्यापीठात जून २०१५ ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत प्रभारी कुलसचिव म्हणून कार्यरत होते. तसेच विद्यापीठात १९९५ ते ९९ या कालावधीत सहाय्यक प्राध्यापक म्हणून त्यांनी अध्यापन केले आहे. तर १९९९ ते २०२१ या वीस वर्षाच्या कालावधीत ते उपकुलसचिव म्हणून कार्यरत आहेत.

त्यांना प्रशासकीय कामाचा मोठा अनुभव आहे.



शिवाजी विद्यापीठातील पाणी व्यवस्थापनात त्यांचे मोलाचे योगदान आहे. विज्ञान, पर्यावरण आणि शिक्षण या विषयावर सातत्यपूर्ण लेखन सुरू आहे. त्यांची आतापर्यंत ४ पुस्तके प्रसिध्द झाली आहेत. त्यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.